# प्रेस नोट

**आरोपी लोकसेवक शेखर जयवंत पाटणकर पोलीस नाईक ब.नं.१४६६ नेमणुक विश्रामबाग पोलीस ठाणे वर्ग-३ यांनी २५,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याने गुन्हा दाखल. सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.**

---

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **सांगली** |
| **पोलीस स्टेशन** | विश्रामबाग पोलीस ठाणे, जि.सांगली |
| **गुन्हा नोंद क्रमांक व कलम** | गु.र.नं.४७४/२०२४, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| **तक्रारदार** | पुरुष वय ४२ वर्षे |
| **आरोपी लोकसेवकाचे नांव व कार्यालय** | शेखर जयवंत पाटणकर पोलीस नाईक ब.नं.१४६६ नेमणुक विश्रामबाग पोलीस ठाणे जि.सांगली वर्ग-३ |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | ५०,०००/- (पन्नास हजार) रुपये लाचेची मागणी |
| **पडताळणी अंती लाच मागणी रक्कम** | २५,०००/- (पंचवीस हजार) रुपये लाचेची मागणी |
| **पडताळणी दिनांक व ठिकाण** | १०/१२/२०२४ भारती हॉस्पिटल सांगलीचे मेनगेट समोरील सांगली मिरज रोड लगत असले रिक्षा स्टॉप जवळ |
| **तपास अधिकारी** | विनायक भिलारे पोलीस निरीक्षक ला.प्र.वि.सांगली |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार हे बांधकाम साईटवर सळी बांधण्याचे कंत्राट घेतात. दि.०७/१२/२०२४ रोजी तक्रारदार यांनी कंत्राट घेतलेल्या इंचकरंजी येथील बांधकाम साईटवर एक अल्पवयीन बालक त्यांचे नातेवाईकास भेटणेस गेलेनंतर झाले अपघातात अल्पवयीन बालक व त्याचे नातेवाईक जखमी झाले होते. सदर जखमीवर भारती हॉस्पिटल सांगली येथे उपचार सुरु होते. विश्रामबाग पोलीस ठाणे येथील पोलीस लोकसेवक शेखर पाटणकर यांनी तक्रारदार यांचेविरूध्द बालकामगार अंतर्गत गुन्हा दाखल न करण्यासाठी व बालकाचा जबाब तक्रारदार याचे बाजुने घेण्यासाठी तक्रारदार यांचेकडे ५०,०००/- रूपयांची लाचेची मागणी केले बाबतची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि.सांगली येथे दिली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १०/१२/२०२४ रोजी पंचा समक्ष पडताळणी केली असता लोकसेवक शेखर जयवंत पाटणकर पोलीस नाईक ब.नं.१४६६ नेमणुक विश्रामबाग पोलीस ठाणे जि.सांगली वर्ग-३ यांनी स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने तक्रारदार यांचे विरुद्ध बालकामगार कामास ठेवले बाबत कारवाई न करण्यासाठी व धीरज माझी याचा जबाब तक्रारदार यांचे बाजुने घेण्यासाठी तक्रारदार यांचेकडे २५,०००/- रूपये लाचेची मागणी केलेली आहे

त्याअनुषंगाने लोकसेवक शेखर जयवंत पाटणकर पोलीस नाईक ब.नं.१४६६ नेमणुक विश्रामबाग पोलीस ठाणे जि.सांगली वर्ग-३ यांचे विरुध्द विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे सो., अपर पोलीस अधीक्षक श्री.विजय चौधरी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री.उमेश पाटील, पोलीस उप अधीक्षक, सांगली, श्री.विनायक भिलारे, पोलीस निरीक्षक, श्री किशोर कुमार खाडे, पोलीस निरीक्षक तसेच पोलीस अंमलदार प्रीतम चौगुले, अजित पाटील, धनंजय खाडे, ऋषिकेश बडणीकर, सलीम मकानदार, चंद्रकांत जाधव, सुदर्शन पाटील, पोपट पाटील, उमेश जाधव, अतुल मोरे, रामहरी वाघमोडे, सीमा माने, राधिका माने यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप व मोबाईल नंबर ९५५२५३९८८९ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

**संपर्क :-**

1) **मोबाईल अॅप -** www.acbmaharashtra.net
2) **फेसबुक पेज -** www.facebook.com-maharashtraACB
3) **वेबसाईट —** www.acbmaharashtra.gov.in

(उमेश दा. पाटील)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
सांगली.

Scanned with OKEN Scanner